२९३

...मपंचायतीमधील गैरव्यवहारासंबंधी जबाबदारी निश्चित करणेबाबत.

९५

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : डीईएन २००६/प्र.क्र.७७१/आस्था-१२,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : २८ सप्टेंबर ,२००६.

जळगांव ... शाखा 10 OCT 2006 मु.का.अ.

**शासन निर्णय :-**

जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांना जबर शिक्षेच्या संदर्भात विभागीय आयुक्तांच्या निर्णयाविरुध्द शासनाकडे पुनर्विलोकन अर्ज करण्याची तरतूद आहे. अशा प्रकरणी सुनावणी घेताना शासनाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, ग्रामपंचायती मधील गैरव्यवहाराबाबत ग्रामसेवक किंवा ग्रामसेवक व सरपंच यांनाच जबाबदार धरण्यांत येते. ग्रामपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे व ग्रामपंचायतीची तपासणी करण्याची जबाबदारी विस्तार अधिकारी (पंचायत) यांचेवर सोपविण्यात आलेला आहे. तसेच काही योजनांमध्ये गट विकास अधिकारी यांनीही पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी सोपविण्यांत आलेली असते. ग्रामपंचायतीमधील विकास कामांची तपासणी करुन त्याबाबत योग्य ते प्रमाणपत्र व मुल्यांकन दाखला देण्याची जबाबदारी कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांच्यावर सोपवियांत आली आहे. वरील बाबीचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

१) ग्रामपंचायती मधील अपहार प्रकरणी संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांच्या व्यतिरिक्त जबाबदारीच्या प्रमाणात विस्तार अधिकारी, कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता, (गट विकास अधिकारी संबंधित असल्यास) यांनाही जबाबदार धरण्यात यावे.

२) या संबंधी पर्यवेक्षकांच्या अनुषंगाने गट विकास अधिका-यांच्या जबाबदारी संदर्भातही कार्यवाही करण्यात यावी.

( 148-1996)

Chief Executive Officer
Zilla Parishad, Jalgaon

८३४

३) ग्रामपंचायतीमधील गैरव्यवहाराबाबत जबाबदारी निश्चित करताना उपरोक्त प्रमाणे कारवाई झाली किंवा कसे याची खात्री उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी करावी.

४) उपरोक्त प्रमाणे संबंधित कर्मचा-यांस शिक्षा प्रस्तावित करताना वरील तरतुदींचे पालन झालेले आहे किंवा कसे याची पडताळणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी व झाली नसल्यास संबंधितावर उपरोक्त प्रमाणे ही जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करावी.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाविरुध्दच्या कर्मचा-यांच्या अपीलावर सुनावणी घेताना विभागीय आयुक्त यांनी वरील सूचनांचे पालन झाले किंवा कसे हे पहावे व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन निर्णय घ्यावेत.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त सर्व सूचना गट विकास अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संगणक सांकेतांक २००६०९२८१६५३०६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.नो.शिंदे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत आवश्यक त्या माहिती व कार्यवाहीसाठी सादर.

१) विभागीय आयुक्त (सर्व)
२) उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त, कार्यालय (सर्व)
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)